MY रायगड ३ पुढारी | मुंबई
गुरुवार, २५ सप्टेंबर २०१४

# व्यवसायातून महिला गृहउद्योगात रुपांतर

पाली : वार्ताहर

सुधागड तालुक्यात परळी घोटावडे येथे दहा वर्षांपूर्वी श्रीमद राजचंद्र आत्मतत्त्व रिसर्च सेंटर प. पू. प्रवीण मेहता यांच्या प्रेरणेने सुरू झाले. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी त्यांना काम उपलब्ध करून देण्याच्या कल्पनेतून श्रमिक नारी संघाची स्थापना करण्यात आली. सुरुवातीस दोन महिलांच्या माध्यमातून गुजराथी आहारातील खाकरा पदार्थ बनविण्याचे कामास सुरुवात झाली. आज या व्यवसायाचे रुपांतर महिला गृहउद्योगात झाले असल्याचे श्रमिक नारी संघाच्या संचालिका सिमी थापर यांनी सांगितले.



महिला गृहउद्योगाचे उद्घाटन प. पू. पप्पाजींच्या प्रमुख उपस्थितीत उद्योगपती बीपीन बाविसी व निशा बाविसी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालिका सिमी थापर, मिता हेमाणी, पुनिता अजमेरा, शिल्पा शहा, श्रुती शेठ, प्राणलाल शहा, बीनीन सावला यांच्यासह आश्रमातील सदस्य उपस्थित होते. यावेळी महिला गृहउद्योगाच्या उत्पादनांचे ब्रॅन्डनेम 'चाक्री' असे ठेवण्यात आले आहे. चाक्री म्हणजे सेवा असा अर्थ होतो. या उद्योगात दिवाळीसाठी लागणारे विविध दिवे, सुका मेवा पॅकिंग, चॉकलेट पॅकिंग आणि विविध चवीचे खाकरे असे उत्पादन महिला उद्योगात घेतले जात आहे. आज या उत्पादनांना देशभर मागणी आहे. या उद्योगाचा विकास करण्याच्या दृष्टीने एक हजार महिलांना काम मिळेल व आंतरराष्ट्रीय स्तरावर श्रमिक नारी संघाचे नाव अभिमानाने घेतले जावे, असे प. पू. प्रवीण मेहता यांनी सांगितले. यावेळी महिला कामगारांना विविध पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. महिला गृहउद्योगातील महिलांसाठी स्वतंत्र बसची व्यवस्था करण्यात आली असून या नव्या बसचे उद्घाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अत्यंत दुर्गम भाग असलेल्या या वाड्यापाड्यांत आरोग्य सेवा देण्याच्या उद्देशाने आश्रमामार्फत फिरता दवाखाना सुरू करण्यात आला होता. याला मिळालेला प्रचंड प्रतिसाद बघता परळी येथे क्लिनिक उघडण्यात आले.

यात मुंबईतील नामांकित डॉक्टर कान, नाक, घसा, त्वचा रोग, श्वसनरोग अशा विविध आजारांवरील सेवा देण्याचे काम करीत आहेत. यावेळी तालुक्यात सर्व सोयींनी युक्त असे मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र आश्रमातर्फे सुरु करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. हरेश ग्रोशर यांनी दिली.